मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीतच लढणार:बावनकुळेंनी केले स्पष्ट

## कोणतीही योजना बंद होणार नसल्याचा दिला विश्वास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वेध लागले आहेत. त्यातच एकनाथ शिंदे महायुतीत नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुती टिकून राहणार की तिन्ही पक्ष वेगवेगळे लढणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. परंतु, आम्ही महायुती म्हणून लढणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच सरकारने सुरू केलेली कोणतीही योजना बंद होणार नाही, असा विश्वासही त्यांनी दिला.

आम्ही विकासाच्या मुद्द्यावर महाराष्ट्र पुढे नेत आहोत. मोदींनी विकसित भारताचा संकल्प केला आहे. या संकल्पाला साथ देण्यासाठी आमच्याकडे अनेक लोक पक्षप्रवेश करत असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. आम्ही कधीही कुणाला आमच्या पक्षात येण्यासाठी जबरदस्ती करत नाही. नरेंद्र मोदींच्या, देवेंद्र फडणवीसांच्या कामाकडे पाहून आपणही भाजपमध्ये गेले पाहिजे, असे लोकांना वाटते. त्यामुळे ते आमच्या पक्षात येत आहेत आणि आम्ही त्यांचे स्वागत करतो, असेही बावनकुळे म्हणाले. आज १ कोटी १६ लाख लोकांनी भाजपची प्राथमिक सदस्यता केली आहे. मोठा पक्ष म्हणून आम्ही काम करतोय. ३ लाख सक्रीय सदस्य करणे आणि दीड कोटी प्राथमिक सदस्य करणे, हा आमचा हेतू असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

एकनाथ शिंदेंनी रविवारी काही आमदारांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी विधानसभा निहाय स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपची कशाप्रकारे तयार असणार याबाबत विचारले असता, एकनाथ शिंदे, अजित पवार किंवा भाजप असो, आपापल्या पक्षाची चाचपणी केली पाहिजे. शेवटी आम्ही महायुती म्हणून लढणार आहोत. आमची महायुती अत्यंत मजबूत आहे. सध्या आम्हीही १ कोटी ५१ लाख प्राथमिक सदस्य नोंदणी करतोय. ३ लाख कार्यकर्त्यांना आम्ही येणाऱ्या काळात सक्रीय करणार आहोत. महाराष्ट्र सरकारमधील योजना समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सर्वजण काम करतोय, असे बावनकुळे म्हणाले.लाडकी बहीण योजना बंद होणार का? याबाबत काही लोकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. परंतु, लाडकी बहीण योजना, शिवभोजन किंवा शेतकऱ्यांची वीज बील माफी कोणतीही योजना बंद होणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हेच सांगितले आहे. मात्र, अटीत बसत नसताना काही लोकांनी हैदोस घालून त्या योजनांचा गैरफायदा घेतला. यासंदर्भातील तपासणी सुरू आहे. व्याख्येत बसत नाहीत, पण योजनेचा लाभ घेतला, अशा लोकांना कमी करावेच लागणार. तर व्याख्येत बसणाऱ्यांना १०० टक्के योजनेचा लाभ मिळणार आहे. सरकारकडे पैसा कमी नाही. त्या–त्या योजनेचा पैसा सरकारकडे आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.




# डॉ.अनिता चव्हाण यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल बोडखे कुटुंब परिवार तर्फे सत्कार

## संघर्ष आणि मेहनतीतून मिळवलेले यश प्रेरणा देणारे असते–उत्तम बोडखे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध मानले; माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजामध्ये समता बंधुत्व ऐक्य आणि सर्व धर्म समभाव हे मूल्य रुजवण्यासाठी शिक्षणातून माणसे तयार झाली पाहिजेत असे सांगून डॉ. अनिता चव्हाण ठाकूर यांनी संघर्षातून मिळवलेले यश हे खऱ्या अर्थाने तमाम महिला भगिनींना आणि ग्रामीण भागातील युवक युवतींना प्रेरणा देणारे आहे! असे मत ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी आज येथे व्यक्त केले.डॉ.अनिता चव्हाण– ठाकूर यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल बोडखे परिवाराच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.शाल श्रीफळ आणि ग्रंथ भेट देऊन सत्कार केल्यानंतर श्रीयुत उत्तम बोडखे अभिनंदन करताना बोलत होते.यावेळी ज्येष्ठ अध्यापिका सौ. बबीताताई बोडखे उपस्थित होत्या.डॉ.चव्हाण अनिता उत्तमराव , इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे झाले. बारावी पर्यंत शिक्षक हंबर्डे महाविद्यालय आष्टी या ठिकाणी पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षण डी.एड. गीता कन्या महाविद्यालय बीड या ठिकाणी पूर्ण केले.त्यानंतरचे पुढचे सगळे शिक्षण मात्र यशवंतराव चव्हाण विद्यापीठ नाशिक या ठिकाणाहून पूर्ण करत करत बी.एड.,एम.एड.या पदव्या घेतल्या तसेच विषय संप्रेषण आणि इंग्रजी या दोन विषयांमध्ये देखील एमए झालेला आहे.२०१८ साली सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांची सेट परीक्षा शिक्षणशास्त्र या विषयात उत्तीर्ण झाले.२०२० आली डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथून पी.एचडी सन्मानित झाली.सेट आणि पीएच.डी या दोन्ही परीक्षा शिक्षणशास्त्र या विषयांमध्ये पूर्ण केल्या आहेत. २०२२ साली डी.एस.एम ही परीक्षा देखील उत्तीर्ण झाले. २०२४ ला सरळ सेवा भरती ने झालेली शिक्षण विस्तार अधिकारी पदाची परीक्षा जिल्हा परिषद नाशिक या ठिकाणाहून उत्तीर्ण होऊन आज रोजी पंचायत समिती पेठ या ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.डॉ.अनिता चव्हाण यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल बोडखे कुटुंब परिवार तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोडखे कुटुंबाने डॉ.चव्हाण यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.डॉ. चव्हाण यांनीही या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करण्याचा मनोदय व्यक्त केला.

# देगलूर येथिल जि.प.पेठामरापुर शाळा येथे विद्यार्थ्यांसाठी असलेले स्वच्छ्तागृह नावालाच धनाजी जोशी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

देगलूर येथिल गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी असलेली जि.प.शाळा म्हणुन ओळखली जाणारी देगलूर येथिल जि.प.पेठामरापुर शाळा येथे विद्यार्थ्यांसाठी असलेले स्वच्छ्तागृह हे नावालाच असलेल्या सारखें झाले असून विद्यार्थ्यांना या गोरसोईचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे येथील स्वच्छतागृह हे नावालाच असुन विद्यार्थ्यांना या ठिकाणी लघुशंका करण्यासाठी लाज वाटत आहे मुली अक्षरश्या तोंडाला रुमाल बांधून इकडे तिकडे बघत लाजिरवाणी त्यांना या ठिकाणी जावे लागते हि बाब खुप दुर्दैवी आहे याबाबत धनाजी जोशी यांनी त्याठिकाणी पाहणी करून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल मॅडम यांच्या कडे लेखी तक्रार करणार असुन याठिकाणी अगोदरच मोडकळीस आलेली जीर्ण इमारत झालेली अतिक्रमण ग्राउंड परिसरात भरलेलं बाजार गुत्तेदाराने मांडलेले गिट्टी मुरुम रेती साठी गोदाम या सर्व बाबींवर धनाजी जोशी यांनी शिक्षण मंत्री, आणि नांदेड जिल्ह्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल मॅडम यांच्या कडे लेखी तक्रार देऊन त्यांचे याप्रकरणी लक्ष वेधण्यासाठी धनाजी जोशी हे तक्रार करणार आहेत.

# पीक विमा योजनेत बदल प्रस्तावितच्या हालचाली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

शेतकर्यांना देण्यात येणार्या एक रुपयात पीक विमा सहभागाच्या योजनेत बनावट पीक विम्याला आळा घालण्यासाठी आता काही महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू झाल्या आहेत.

त्यामध्ये प्रामुख्याने पीक विमाऐवजी 'नमो शेतकरी महासन्मान' योजनेतून शेतकर्यांना वाढीव मदत देणे, दोन हेक्टर क्षेत्र मर्यादित एक रुपयात पीक विमा देणे व उर्वरित क्षेत्रासाठी नियमित विमा हप्ता भरणे किंवा शंभर रुपयांत पीक विमा सरसकट करणे आदी बदलांवर गांभीर्याने विचार सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे.कापूस– सोयाबीन क्षेत्र लागवड असलेल्या शेतकर्यांना ई– पीक पाहणी आधारित त्यांच्या क्षेत्रानुसार ठोक मदत करणे किंवा हंगामाच्या सुरुवातीला शेतकर्यांना त्यांचे क्षेत्र आधारित रक्कम देणे असे पर्याय जास्त संयुक्तिक असल्याचे सांगण्यात येत असून, त्यावर राज्य सरकारच्या स्तरावर विचारमंथन सुरू असल्याची माहिती कृषी आयुक्तालयातील सूत्रांनी दिली.

गुजरात व तेलंगणा राज्याप्रमाणे पीक लागवड क्षेत्र आधारित थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात निश्चित दराने मदत दिली जावी. पीक विमा योजनेतून स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसानी बाबी वगळण्यात यावी, असाही प्रस्ताव असल्याचे सांगण्यात येते.कारण, केंद्राच्या नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स तथा एनडीआरएफमधून शासन ठरावीक दराने निश्चित दराने मदत देते. शिवाय सर्व शेतकर्यांना सारख्या प्रमाणात मदत मिळत असल्याने तक्रारी होत नाहीत. आंध्र प्रदेश व कर्नाटक राज्यात शंभर टक्के पीक पाहणी आहे. त्यानुसार राज्यातही ई– पीक पाहणी शंभर टक्के बंधनकारक करावी. जे क्षेत्र ई पीक पाहणीत नाही ते विमा प्रस्ताव रद्द करण्यावरही विचार शक्य आहे.

# कळका येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**

सर्व जनतेस व भक्तांना कळविण्यात येते की दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मौ. कळका ता. कंधार जि. नांदेड येथे अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजीत केलेला आहे. तरी सर्व भविक भक्तांनी या कार्यक्रमाचा आवश्य लाभ घ्यावा.प्रारंभमिती फाल्गुन शु. ०५ शके १९४६ सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा आरती, ६ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाया भजन, दुपारी ४ ते ६ प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन, ११ ते ४ जागरण किर्तनकार दिनांक: ०४–०३–२०२५ वार मंगळवार श्री ह.भ.प. तुळशीराम महाराज गऊळकर, प्रवचनकार श्री हु.भ.प. माधव महाराज मुंडे ,संध्याकाळचे अप्रदाते श्री दिगांबर बळीराम पाटील दिनांक: ०५–०३–२०२५ वार बुधवार श्री ह.भ.प. माधव महाराज घागरदरेकर,प्रवचनकार श्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कळकावाडीकर सकाळचे अत्रदाते भी उत्तम अप्पाराव पाटील संध्याकाळचे अत्रदाते: श्री गुरुनाथ किशन पुरी,दिनांक: ०६–०३–२०२५ वार गुरुवार कु. ह.भ.प. पुजाताई मंग्याळकर प्रवचनकार: श्री ह.भ.प.निवृत्ती महाराज पुटवाड ,सकाळचे अनदाते श्री अंगत घुराजी पाटील संध्याकाळचे अन्नदाते श्री स्वप्नील उत्तमराव पाटील,दिनांक: ०७–०३–२०२५ वार शुक्रवार श्री ह.भ.प. कृष्णा महाराज राजुरकर,प्रवचनकार श्री ह.भ.प.वा.ल. श्रीमंगले सर सकाळचे अन्नदाते श्री रामराव सोनबा पाटील संध्याकाळचे अन्नदाते श्री देवीदास विठ्ठल पाटील सांगता मिती काल्गुन शु. १२ शके १९४६ दि.११–०३–२०२५ किर्तनकार,दिनांक: ०८–०३–२०२५ वार शनिवार श्री ह.भ.प. शंकर महाराज लॉठे प्रवचनकार श्री ह.भ.प.तुळशीराम महाराज मंगनीकर सकाळचे अन्नदाते श्री माधव धुराजी पाटीत संध्याकाळचे अन्नदाते श्री तुकाराम शिवराम पाटील दिनांक : ०९–०३–२०२५ वार रविवार श्री ह.भ.प. नवनाथ महाराज डोंगरशेळकीकर काल्याच्या किर्तना नंतर लगेच महाप्रसाद प्रवचनकार श्री ह.भ.प. देविदास महाराज शिरशीकर सकाळचे अन्नदाते श्री गोविंद संग्राम पाटील संध्याकाळचे अन्नदाते श्री नवनाथ विठ्ठल पाटील,दिनांक: १०–०३–२०२५ वार सोमवार श्री ह.भ.प. रोहिदास महाराज कळकेकर प्रवचनकार श्री ह.भ.प.एम.जी. गायकवाड (न्यायधीश) सकाळचे अन्नदाते श्री निळकंठ मारोतीराव पाटील संध्याकाळचे अन्नदाते श्री रामकिशन शंकर जाधव,दिनांक: ११–०३–२०२५ वार मंगळवार श्री ह.भ.प. शंकर महाराज चिंचकर बीड यांचे १० ते १२ काल्याचे किर्तन होईल सकाळचे अन्नदाते: श्री मधुकर व्यंकटराव पाटील,दिनांक : ०९–०३–२०२५ रोज रविवार सायं. १०:०० वा महाराष्ट्राचे सुप्रसिध्द भारुडकार श्री ह.भ.प. कृष्णा महाराज जोगदंड यांचा भारुडाचा कार्यक्रम विनेकरी:श्री ह.भ.प. गंगाधर महाराज मदड, श्री ह.भ.प. रामकिशन महाराज पाटील गायनाचार्य:श्री ह.भ.प.संभाजी महाराज हिव्बटकर,,श्री ह.भ.प. पद्माकर महाराज मरशीवनीकर,मृदंगाचार्य :श्री सिध्देश्वर महाराज कळकेकर,श्री मारोती महाराज कळकेकर पुजेकरी :सौ. कुशवर्ताबाई बाबुराव पांचाळ,भजनी मंडळी कळका, बोरी, कागणेवाडी, मंगनाळी, पेठवडज, नावंदेवाडी, कळकावाडी, आंबुलगा आयोजक समस्त गावकरी मंडळी, कळका ता. कंधार जि. नांदेड नोट : कळका हे गाव आंबुलगा पासुन पुर्वेस ७ कि. मी. अंतरावर आहे.संपर्क: ७४९९२७९७७९, ७९७२७६३२९९, ८६६८४४५८९४



# होय हा मुलगा बनवतो अफलातून इलेक्ट्रॉनिक वस्तू ;५ वीत शिकणाऱ्या आराध्यचे संशोधन

## आराध्यने इंजेक्शन पासून बनवलेल्या लायटरवर पेटतो गॅस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । सचिन खंडारे**

असं म्हटले जाते की बाळाचे पाय पाळण्यात दिसतात ,
म्हणजेच बालवयात जो ते काम करतो ते काम भविष्यात खूप मोठे होईल खूप मोठा पराक्रम तो गाजू शकतो '
असाच एक पराक्रम अवघ्या पाचवीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या आराध्य राहुल कुमार सुरुशे
यांनी करून दाखवला आहे '
सविस्तर वृत्तांत असा की
आराध्य हा राहुल कुमार सुरुशे दे . राजा यांचा मुलगा त्याची आई क्रांती सुरुशे (मेरत ) त्यांचे दोघेही आई-वडील जिल्हा परिषद शाळेवर शिक्षक आहेत,
क्रांती मेरत यांचं माहेर सिंदखेडराजा तालुक्यातील बाळ समुद्र येथील आहे ,आई वडील शिक्षक असल्यानंतर मुलगाही काहीतरी वेगळं करेल असा अनेकांचा अंदाज असतो '
परंतु आराध्य याला टाकाऊ वस्तु पासून इलेक्ट्रॉनिक वस्तू बनवण्याचा आगळावेगळा छंद आहे 'हा छंद पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्याशिवाय राहणार नाही कारण तो वस्तूच बनवतो कि सर्वजण चक्राहून झाल्याशिवाय राहणार नाही ,आराध्य हा सुट्टीच्या दिवशी बाजारात गेला तर इलेक्ट्रॉनिक वस्तूचे सुटे पार्ट आणत असतो ,,
आणि स्वतःच्या बुद्धीने स्वतःच्या कल्पनेने कुठल्याही प्रकारचं मोबाईलवर युट्युब वरून व्हिडिओ बघून तो कुठलेही वस्तू बनवत नाही



तर त्यांची वस्तू बनवण्याची पद्धत ही स्वतःची आहे हे विशेष ,इंजेक्शना पासून
आराध्यने लाईटर बनवली आहे '
त्याचा उपयोग घरगुती गॅस पेटवण्याकरता ते स्वतः करतात '
आईस्क्रीमच्या काड्या पासून त्याने रोबोट तयार केला आहे 'तसेच त्याने हायड्रोलिक जेसीबी सुद्धा तयार केलीआहे ' अनेक विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू त्यांनी बनवलेली आहेत एखाद्या संशोधकालाही एवढं जमलं नसतं तेवढं आराध्यने करून दाखवलं ' त्याची बुद्धिमत्ता खरंच खूप प्रगल्भ आहे ' टाकाऊ वस्तु पासून दर्जेदार संशोधन करून तो विविध वस्तू तयार करतो ' त्यामुळे त्याची दखल घेण्याची नितांत गरज आहे '

आराध्य हा स्वतः वस्तू बनवतो त्याला कुठलेही प्रकारचं कोणाचंही मार्गदर्शन नाही . '
त्याला योग्य मार्गदर्शन एखाद्या संस्था अथवा व्यक्तीकडून प्राप्त झाल्यास तो त्या विषयांमध्ये सकारात्मक प्रगती करू शकेल
असे मत आराध्यचे आई क्रांती सुरुशे , राहुल सुरुशे ,तथा डॉक्टर संजय मेरत यांनी व्यक्त केले आहे .
– त्यामुळे कमी वयामध्ये आराध्य च्या इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक्स वस्तू बनवतो
– कुठल्याही प्रकारचं मोबाईल तो वापरत नाही .
– त्यामुळे सरकारने तरी दखल घ्यावी अशी मागणी होत आहे .

# रखडलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ Dच्या कामाविरोधात आढळगाव सरपंच सह ग्रामस्थांचे आमरण उपोषण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

आढळगाव ता.श्रीगोंदा येथील राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी च्या कामातील दिरंगाई आणि होत असलेल्या हलगर्जीपणाच्या विरोधात आढळगाव येथील ग्रामस्थांनी दि.१७ फेब्रुवारी २५ सकाळी १० वाजता बस स्थानका समोर आमरण उपोषण सुरू केले. या आंदोलनाचे नेतृत्व ग्रामपंचायत सरपंच शिवप्रसाद उबाळे करत असून, संपूर्ण गावाच्या सहकार्याने हे आंदोलन सुरु आहे.गेल्या काही महिन्यांपासून महामार्गाचे काम अत्यंत कासव गतीने सुरू आहे. परिणामी, रस्त्यावरील धुळीच्या त्रासामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासोबतच, पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाइन




तुटल्यामुळे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे या समस्यांवर त्वरित तोडगा काढावा यामध्ये प्रमुख मागण्यासह राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम त्वरित चालू करावे आणि विनाअडथळा पूर्ण करावे, महामार्गाच्या धुळीमुळे होणाऱ्या त्रासावर उपाय म्हणून रोज टँकरने पाणी मारावे, महामार्गाचे काम ३० मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन द्यावे, आढळगाव ग्रामपंचायतच्या तुटलेल्या पाईपलाईन त्वरित दुरुस्त करून नवीन पाईपलाईन टाकावी,प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा आणि जवाहरलाल नेहरू विद्यालय येथे टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करावी,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ओटा, बस स्टँड, तुकाई माता मंदिर, लक्ष्मी माता मंदिर, पथदिवे आणि हायस्कूलच्या ओव्हरब्रिजचे काम त्वरित सुरू करावे. या मागणीसाठी सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनात ज्येष्ठ नेते शहाजी बापू वाकडे, माजी सभापती विलासराव भैलुमे, ह भ प हनुमंत गिरमकर, हनुमंत डोके, सत्यवान शिंदे, अंबादास चव्हाण, नानाभाऊ बोळगे, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

प्रशासनाने या मागण्यांकडे वेळीच लक्ष न दिल्यास संघर्ष अधिक तीव्र केला जाईल. उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले आहे की, जबाबदार अधिकाऱ्यांनी तत्काळ लेखी हमी न दिल्यास उपोषण मागे घेतले जाणार नाही – उपोषणकर्ते

# देगलूरच्या आठवडी बाजारात मोबाईल चोरांचा सुळसुळाट

### पोलिसांची गिळते चोरांना साथ गहाळ म्हणजे चोरी नाहीच



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । धनाजी जोशी**

गोपाळ गंगाधर बिडवई देगलूर जि.नांदेड येथील रहिवाशी असून ते दिनांक १५/०२/२०२५ शनिवारी संध्याकाळी वेळ ०५:०० च्या सुमारास देगलुर पोलीस स्टेशन समोर भाजीपाला घेत असताना खिशातून मोबाईल चोरीला गेला आहे. मोबाईल ओपो घ१२५० (Oppo 12x30) चा सिमकार्ड नंबर एअरटेल मोबाईल नं: ९८५०३९४४८६, ७३५८८५०७७७ असून हा चोरीला गेला आहे. भरपूर शोध घेऊनही सापडला नाही मोबाईल (Oppo K12x50) Midnight Violet Colour/ मध्यरात्री वाचलेट रंगाचा असून त्यांचा IMEI 1 ८६८०४७०७८९९५९९४, IMEI 2 ८६६०४७०७८९९५९८६ आहे . ताइरीसश ठाणे अमलवार पोलीस क्षेत्र देगलूर जि नांदेड गोपाळ गंगाधर बिडवई रा. बापुनगर देगलूर ता. देगलूर जि. नांदेड मो.९१५८६९१११८

# शेतकऱ्यांच्या अनुदान संदर्भात तहसीलदार यांच्याशी चर्चा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील अतिवृष्टीचे अनुदान अद्यापही शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने बिलोली तालुका रोजगार हमी योजनेचे माजी तालुकाध्यक्ष डॉ के.बी कासराळीकर, यांनी नुकतीच बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ टाकण्याचे विनंती केली तसेच निवासी नायब तहसीलदार मिठेवाड, संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार परळीकर यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली यावेळी सामाजिक कार्यकर्ते सय्यद रियाज उपस्थित होते.

# सिंदखेड राजा पोलीस स्टेशन येथे शिवजयंती निमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

: सिंदखेड राजा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दिनांक १७/०२/२०२५ रोजी शहर आणि ग्रामीण भागात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी होत असल्यामुळे पोलीस स्टेशनच्या वतीने शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठक पोलीस निरीक्षक ब्रह्मदेव शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकी मध्ये शहर आणि ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक तुषार जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप वायाळ यांनी शिवजयंती उत्सव साजरा करताना शासनाच्या नियम व अटी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



तसेच १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त सिंदखेड राजा शहरात मिरवणुकी दरम्यान अवैद्यरित्या कोणताच गैरप्रकार करू नये, गैरप्रकार करणाऱ्या वर तक्रार प्राप्त झाल्यास,कडक कारवाई करण्यात येईल असे पोलीस निरीक्षक ब्रह्मदेव शेळके यांनी या बैठकीदरम्यान सूचना दिल्या.शिवजयंती निमित्त शहरात लावण्यात येणारे डिजिटल बॅनर हे देखील ठरवून दिलेल्या जागेतच व नगरपालिकेची परवानगी घेऊनच लावावेत. तसेच मंडप व लाऊड स्पीकर साठी प्रशासनाची परवानगी घेण्याच्या सूचना मंडळ व कार्यकर्त्यांना देण्यात आल्या.त्याचप्रमाणे डीजे लावण्या बाबत असलेल्या नियमावली चे पालन करणे बाबत सूचना देण्यात आले.
यावेळी बैठकीसाठी उपस्थितांची व अधिकाऱ्यांची विविध विषयावर चर्चा होऊन, बैठक शांततापूर्ण खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.याप्रसंगी मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक तथा छावा जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव,चंदूभाऊ साबळे (मा उपनगराध्यक्ष सिंदखेड राजा) तथा अध्यक्ष शिवजयंती उत्सव समिती,अमर सोनोशे,बाळू कव्हळे शाखा अध्यक्ष छावा, सुदाम कव्हळे, सचिन कव्हळे आणि त्यांचे सर्व कव्हळे सहकारी तसेच सिंदखेड राजा शहर आणि ग्रामीण भागातील विविध मंडळ, संघटनांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाबळेश्वरजवळील मांघर-महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'मधाचे गाव' ठरते आदर्श मॉडेल!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांघर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महाबळेश्वरजवळील मांघर हे भारतातील पहिले अधिकृत 'मधाचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावातील मध उद्योगात महिलांचा सक्रिय सहभाग असून, तो केवळ आर्थिक उपजीविकेपुरता मर्यादित नाही, तर ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणाचा प्रभावी मार्ग ठरला आहे.संशोधक सौ. सुवर्णा भारत कऱ्हाड (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव) यांनी मांघर गावातील मध उद्योगावर सखोल अभ्यास करताना महिला मध उत्पादकांच्या योगदानाचा विशेष अभ्यास केला आहे. या संशोधनात महिलांनी मधमाशी पालन, मध संकलन, प्रक्रिया, विक्री आणि उत्पादनासंदर्भात घेतलेल्या पुढाकाराची माहिती समोर आली आहे.

**महिला व मध उद्योग – आत्मनिर्भरतेचा नवीन मार्ग**

या संशोधनानुसार, गावातील ८०% लोक मधमाशी पालन व्यवसायात कार्यरत आहेत, ज्यात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. मधमाश्यांची निगा राखणे, मध संकलन, प्रक्रिया, पॅकिंग आणि विक्री या टप्प्यांमध्ये महिला मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. काही महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करून मध उत्पादने तयार करत आहेत, जसे की मधयुक्त साबण, सौंदर्यप्रसाधने आणि आरोग्यपूरक पदार्थ.तथापि, महिलांना व्यवसाय वाढवण्यासाठी काही अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामध्ये मालकी हक्काचा अभाव, आर्थिक पाठबळ मिळवण्यातील अडथळे, तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव आणि पारंपरिक सामाजिक




बंधने यांचा समावेश आहे.

**शासन आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची**

संशोधनात असे सुचवले आहे की, महिलांसाठी विशेष प्रशिक्षण, स्वयं-सहायता गट, सहकारी संस्था, तसेच सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे. मध उत्पादनातील महिलांना थेट बाजारपेठेशी जोडणे, त्यांना वित्तीय सहाय्य मिळवून देणे आणि तांत्रिक प्रशिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.सौ. सुवर्णा कऱ्हाड यांच्या संशोधनातून हे स्पष्ट होते की, महिलांना योग्य पाठबळ मिळाल्यास त्यांचा मध उद्योगातील सहभाग आणखी वाढू शकतो. त्यामुळे केवळ महिलांचे आर्थिक सशक्तीकरण होणार नाही, तर संपूर्ण समाजाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.मध उद्योगाच्या माध्यमातून महिलांचे स्वावलंबन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाजाने महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे या संशोधनातून सुचविण्यात आले आहे.मांघर हे गाव ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा एक आदर्श मॉडेल बनत आहे आणि येत्या काळात महिला उद्योजकतेच्या नव्या संधी उघडण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**डॉ सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र**

# श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे स्वराज्य सप्ताहाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मराठवाडा । बाजीराव पाटील गायकवाड**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक ,महाराष्ट्राची अस्मिता श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्ह्यातील विविध भागात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्वराज्य सप्ताहाच्या तयारीच्या अनुषंगाने साई सुभाष निवासस्थानी आज आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये दिनांक २० फेब्रुवारी रोजी भोकर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पहिला मेळावा पार पडणार असल्याची माहिती देण्यात आली.


या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी बरवडेकर, रामदास पाटील सुमठाणकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर, मोहम्मद खान पठाण, माजी जि.प.सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, माधव पावडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मोहसीन खान पठाण, कन्हैया कदम, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे शिवचरण डांगे, पप्पू जाधव गायकवाड, श्रीधर नागापूरकर, नेताजी भोसले, एकनाथराव वाघमारे, डॉ.उत्तमराव सोनकांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हाध्यक्ष सुनंदाताई जोगदंड, राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष संभाजी पाटील मुकणार, जयश्रीताई पाटील सुरेखाताई पाटील, अर्धापूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष शशी पाटील, मुदखेड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष आनंद टिपरसे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भोकर तालुकाध्यक्ष राजेश्वर देशमुख, गणेशराव शिंदे यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये स्वराज्य सप्ताह कशाप्रकारे साजरा करायचा यावर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार दिनांक १९ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी दरम्यान शिवजयंती, संत गाडगेबाबा जयंती, मराठी भाषा दिन या महत्त्वाच्या तिथींचा सुयोग्य संगम साधून स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड शहरातील नंदगिरी किल्ला व कंधार येथील भुईकोट किल्ल्यांचे सेल्फी पॉइंट शिवजयंती निमित्त सर्व प्रमुख चौकात लावावे, भव्य शिव शोभायात्रा, बाईक रॅली, रांगोळी, बाल शिवाजींच्या रूपात मुलांना तयार करणे स्पर्धा, राजमाता जिजाऊ आणि शिवाजी महाराज यांच्यावर गाणे लिहिणे, घरात शिवाजी महाराज आणि जिजाऊंची प्रतिमा लावणे, तसेच जिथे किल्ले गडकोट व दुर्ग असतील त्यांची स्वच्छता मोहीम जिथे गडकोट, किल्ले किंवा दुर्ग नसतील तिथे शिवरायांच्या स्मारकाची स्वच्छता किंवा पुतळ्यांची स्वच्छता मोहीम उपक्रम स्थानिक ट्रेकर्सचे ग्रुपच्या माध्यमातून करावयाची आहेत असे ठरविण्यात आले आहे. माझ्या उपस्थितीत दि.२० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने, भोकर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये भोकर विधानसभा मतदारसंघातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश होणार आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने

## काल भोकरदन येथे शंकर पटाचे आयोजन केले होते

**पूर्ण १लाख ७० हजार रुपयेची जंगी लूट ठेवण्यात आली होती**



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

पूर्ण १लाख ७० हजार रुपयाची जंगी लुट ठेवली होती त्यामध्ये सर्व विजयी गाडा मालकाचे हार्दिक अभिनंदन करून त्यामध्ये दोन गट ठेवलेले होते एक मोठा गट, जनरल गट, आणि दुसरा छोटा गट (ड गट) असे दोन गट ठेवले असता त्यामध्ये मोठ्या गटामध्ये टाईम (५ सें.६८ मिली पॉईंट) प्रथम क्रमांक २१००० चे मानकरी ठरलेले विश्वास सुरडकर नेवपुर ता. कन्नड यांचा बैल (बबल्या) व हरून शेठ नानेगाव ता. सिल्लोड यांचा (सुंदर) छोटा गट (ड गट) यामध्ये टाईम(५से.५४ मिली पॉईंट) प्रथम क्रमांकाचे २१००० रु. मानकरी ठरलेले मदन दादा झोरे अवघडराव सावंगी तालुका भोकरदन यांचा (श्रीमंत) व दिलीप सोनुने सरपंच लिहा तालुका भोकरदन यांचा (अर्जुन) आयोजक कमिटी एम एच २१ बैलगाडा संघटना विकास भाऊ जाधव भोकरदन, भूषण देशमुख भोकरदन, भूषण जाधव भोकरदन, संतोष दळवी मनापुर, कृष्णा तराळ भोकरदन, रवी सुरसे भोकरदन, दीपक पुंड भोकरदन, विनोद जाधव मालखेडा, विनोद दळवी मनापूर, संतोष घायवट मनापूर, हनुमंत तळेकर फतेपुर.

## माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या शुभहस्ते जुना लोह्यात अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

गेली तीस वर्षांपासून यंदाही सद्गुरू त्रिकाल वंदनिय श्री गुरु ष.ब्र.प्र. १०८ डॉ.नदीकेश्वर लाशिनेश्वर शिवाचार्य महाराज लासीनमठ पुर्णा व बालतपस्वी राजशेखर महाराज विरमठ अहमदपूर यांच्या आशीर्वादाने अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याचा प्रारंभ शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या शुभहस्ते पुजा विधी करून सिध्देश्वर महादेव मंदिर जुना लोहा येथे दि.(१७) फेब्रुवारी रोजी सोमवारी मोठ्या उत्साहात भक्ती भावाने प्रारंभ झाला.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता भाऊ वाले, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, मल्लिकार्जुन शेटे,आप्पाराव पवार, नामदेव पाटील पवार, सुर्यकांत बगाडे, संभाजी चव्हाण, नंदकुमार कहाळेकर, दत्ता वसमतकर, गजानन चव्हाण,संजय कहाळेकर, लक्ष्मण कांजले, बाळू शेटे,हानुमंत पवार, कैलास कहाळेकर, सुर्यकांत कहाळेकर, सचिन कोटे,मन्मथ कांजले, मारोती वड, देवराव वसमतकर, बाबाराव शेटे, व्यंकटराव पवार, विठ्ठलराव पवार आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सदरील शिवनाम सप्ताहानिमित्त दि.१७ फेब्रुवारी ते दि.२४ फेब्रुवारी दरम्यान दररोज अनुक्रमे किर्तनकार शिभप महानंदाताई स्वामी हिंगोलीकर,शिभप अमोल महाराज लांडगे,कावेरीताई किशनराव मुदखेडे, निळकंठ महाराज विभुते, भगवंतराव पा.चाभरगेकर ,शिवशरण गुरूजी सावरगांवकर, शिभप आचार्य गुरूराज स्वामी महाराज, आजगरराव पळसकर दुभ फराळ तर महाप्रसादावरील किर्तन श्री ष ब्र प्र. डॉ.नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज पुर्णा यांचे टाळारतीवरील किर्तन सकाळी शिव किर्तन सकाळी ९ ते ११ या वेळेत होईल.तसेच सप्ताहात प्रवचन अनूक्रमे प्रवचकार शिभप बागठाणे महाराज पुणेकर,शिभप नागोराव शिराळे,शिभप शिवानंद महाराज दापसेडकर, शिभप सदाशिव महाराज परभणीकर,शिभप प्रेमलताई कहाळेकर,शिभप देऊबाई तोडकर,शिभप आचार्य गुरूराज यांचे प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच महाशिवरात्री निमित्त बुधवारी रात्री ९ ते ११ यावेळेत शिभप हणमंतराव भालेराव गुरूजी यांचे किर्तन होणार आहे.

### पिंपळगाव येथील शिव महापुराण कथा व श्री १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग महायज्ञ सोहळ्यास

# दीड लाखाच्या वर भक्त मंडळी उपस्थित राहणार-प.पू.बालयोगी व्यंकटस्वामी महाराज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**





श्री शिव सद्गुरु शिवलिंग स्वामी दत्त संस्थान मठ तीर्थक्षेत्र पिंपळगाव तालुका हदगाव जि. नांदेड येथे दिनांक ६ मार्च २०२५ ते दिनांक १३ मार्च २०२५ दरम्यान आयोजित भव्य शिव महापुराण कथा व श्री १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग महायज्ञ व नाम कीर्तन सोहळ्याला संबंध महाराष्ट्रातून दीड ते दोन लाख भाविक भक्तांची उपस्थिती राहणार असून संबंध भारतातील ४०० च्या वर महान साधुसंत मंडळी आपली उपस्थिती लावून दर्शन देतील अशी माहिती संस्थांचे प्रमुख प.पू.गोवत्स तपस्वी बालयोगी व्यंकटस्वामी महाराजांनी आयोजित पत्रकार परिषदेतून बोलताना दिली. यावेळी संयोजन समितीचे सेवक गण व भोकर अर्धापूर,हदगाव,तामसा येथील पत्रकार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.पुढे बोलताना त्यांनी सांगितले की आम्ही सन २०१७ पासून या कार्यक्रमाची आखणी करत होतो.कारण मानव धर्म जिवंत राहण्यासाठी वेळोवेळी महान साधू संतांचे विचार मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य बहुजन समाजाच्या डोक्यात उतरले पाहिजेत.त्यासाठी महापुरुषांच्या ज्ञान यज्ञाचे आयोजन सतत करणे गरजेचे आहे.या व्यापक उद्देशाने व धर्म रक्षणासाठी या परिसरातील सुज्ञ भाविक भक्तांच्या योगदानातून या भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन नियोजन करण्यात आले आहे. या भव्य शिव महापुराण कथेचे मुख्य कथा प्रवक्ते अनंत श्रीविभूषित श्रीमज्जगद्गुरु द्वाराचार्य श्री अग्नीपिठादीश्वर एवं मलूकपिठाधीश्वर स्वामी श्रीराजेंद्रदास

देवाचार्यजी महाराज श्री रेवासा- वृंदावन धाम उत्तर प्रदेश हे राहणार असून या कार्यक्रमास अखंड भारतातील जगद्गुरु,महामंडलेश्वर, शिवाचार्य,पीठाधीश्वर स्थानिक संतांच्या परंपरेतील दिव्य विभूती दर्शन देण्याकरिता अयोध्या,मथुरा,काशी,जगन्नाथ पुरी,वृंदावन, चित्रकुट,द्वारका,बद्रीनाथ,केदारनाथ, उत्तरकाशी,हरिद्वार,ऋषिकेश,उज्जैन,श्रीशैलम व महाराष्ट्रातील साधुसंत तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार,मंत्री गण आदी सह अध्यात्मिक,सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी,पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. ही भव्य शिव महापुराण कथा दुपारी १२ ते ४ या वेळेत संपन्न होणार असून कथेनंतर लगेच महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ६ काकडा भजन,७ ते १० श्री गुरुचरित्र,श्री ज्ञानेश्वरी, परमरास्य पारायण अनुष्ठान,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,रात्री ८ ते १० महाराष्ट्रातील नामवंत संतांचे हरिकीर्तन व ११ ते ४ महापूजा राहणार आहे. दिनांक ६ मार्च गुरुवार परमपूज्य राधाकृष्ण जी महाराज जोधपुर यांची भव्य भजन संध्या.दिनांक ७ मार्च शुक्रवार श्री ष.ब्र. १०८ ज्ञान भास्कर महादेव शिवाचार्य महाराज वाई जिल्हा सातारा. दिनांक ८ मार्च शनिवार ह.भ.प.विदर्भरत्न रामायणचार्य संजय महाराज पाचपोर,आळंदी.दिनांक ९ मार्च रविवार ह.भ.प.डॉ.कृष्णा महाराज चौरे पंढरपूर. दिनांक १० मार्च सोमवार ह.भ.प.महंत प्रमोद महाराज जगताप बारामती.दिनांक ११ मार्च मंगळवार ह.भ.प. जयवंत महाराज बोधले पंढरपूर.दिनांक १२ मार्च बुधवार श्री ष.ब्र.१०८ वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज थोरला मठ,वसमत. दिनांक १३ मार्च गुरुवार श्री आचार्य परमपूज्य स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज माधापुरी यांचे काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाचे वाटप व कार्यक्रमांची सांगता होणार आहे. या कार्यक्रमात विविध मान्यवरांचे प्रवचन तसेच मार्गदर्शनही लाभणार आहे. येणाऱ्या साधुसंत साठी निवास व्यवस्था पर्णकुटीतून करण्यात आली आहे.तशेच येणाऱ्या सर्व श्रोते मंडळी साठी बसण्यासाठी भव्य मंडप व्यवस्था पाण्याची व्यवस्था,भोजन व्यवस्था व इतर सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.या भव्य दिव्य ज्ञान यज्ञ सोहळ्यात दुकानदारांनी कोणत्याही प्रकारची दुकाने लावू नयेत अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसेच ज्या ज्या भाविक भक्तांना या महान विश्व शांती ज्ञान यज्ञात तन मन धनाने सेवा करायची असेल तसेच काही दान द्यायचे असेल तर त्यांनी संयोजन समितीसी संपर्क साधावा असेही आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले आहे.

# मौजे येळी ता.लोहा येथे अवैद्यरित्या गौण खनिज (रेती) उपसा करणाऱ्यावर कार्यवाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । प्रतिनिधी**





दिनांक १६.०२.२०२५ रोजी १०.१५वा. मौजे येळी ता. लोहा गोदावरी नदीचे पाटावर शेत गट क्र.२७ गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार मा. श्री अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड मा. श्री. खंडेराव धरणे, अपर पोलीस अधीक्षक साहेब, भोकर मा.श्री.सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड मा. डॉ. अश्विनी जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग कंधार यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री.सी.पी. पवार, सपोनि पो.स्टे. उस्माननगर, २. मा.श्री पी. सी. बोधनकर, सपोनि पो.स्टे. उस्माननगर, ३. श्री. गजानन गाडेकर, पोउपनि पो.स्टे. उस्माननगर, ४. पोहेकों ८५१ सुशील कुबडे, ५. पोकों २७४८ प्रकाश पेदेवाड, ६. पोकों ३३० अनिरुध्द वाडे, ७. पोकों २९९२ माधव पवार, ८. पोकों ४२८ तुकाराम पवार, ९. चापोको २६६७ बलवंत कांबळे सर्व पो.स्टे. उस्माननगर आरोपीचे नाव व पत्ता: नवनाथ बालाजी मोरे रा. नायगाव जि. नांदेड जप्त मुद्देमाल:– १. आठ लोखंडी बोटी किमती अंदाजे ८०,००,०००/– रुपये सहा इंजन किमती अंदाजे १२,००,०००/– रुपये एक जेसीबी ढ–ढ– हिताची एद २१० डउ किमती अंदाजे ५०,००,०००/– रुपये पंचवीस ब्रास गौण खनिज (रेती) किमती अंदाजे १,०५,०००/– रुपये असा एकूण १,४३,०५,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हयाची हकीकत :– मा. अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड यांनी 'ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत मौने येळी ता.लोहा जि.नांदेड गट क्र.२७ मध्ये अवैधरित्या गौण खनिज (रेती) उत्खनन व घोरटी विक्री करीत असणाऱ्या आरोपींचा शोध घेवून त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्या बाबत मा.डॉ. अश्विनी जगताप, उपषियोअ कंधार यांना आदेश दिले होते. त्यावरुन त्यांनी सपोनि सी.पी.पवार, सपोनि पी.सी.योधनकर, पोउपनि गाडेकर, सर्व पो.स्टे. उस्मानमगर यांचे पथक तयार करुन त्यांनी अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आदेशित केरले होते. दिनांक १६.०२.२०२५ रोजी ०८.५८ था. स्टे.डा.०५ अन्वये पथकातील सपोनि सी.पी. पधार, सपोनि पो.सौ. बोधनकर, पोउपनि गाडेकर, सर्व अधिकारी व अंमलदार मांचे सह हद्दीत अवैद्य धंदयाची गोपनिय माहीती घेत असतांना मिळालेल्या गोपनिय माहोती वरुन मौजे वेळी ता.लोहा गट क्र.२७ मध्ये गोदावरी नदीपात्रातून घोटींच्या साहयाने विनापरवाना अवैधरित्या गौण खनिज (रेती) काढून जेसोथो च्या साहयाने रेती साठा करीत असायाचो खाजीशिर बातमी मिळाल्यावरुन आम्ही आमचे पथकासह मौजे वेळी ता.लोहा गट क्र. २७ येथील गोदावरी नदीपात्रा जवळ जावून पाहणी केली असता गोदावरी नदीपात्राचे घाटावर आठ लोखंडी बोटी, बोटीला लावलेले सहा इंजीन व एक ने सी बी मशिनचे सहाय्याने रेती उपसा करणारे बोटीवर असलेले व जेसीबी मशिन वरील इसम आम्हाला पाहुण पळून गेले. त्यानंतर आम्ही मा.श्री पाठक साहेब नायब तहसिलदार लोहा, ग्राम महसुल अधिकारी श्री गोधने यांना संपर्क साधला असता त्यांनी कळविले की, लोखंडी बोटीची व जेसीपी यो वरिष्ठ कार्यालयातून परवानगी घेतलेली नाही व सदरील रेती साठा अवैधरित्या उपसा करत आहेत अशी खात्री झाल्याने त्याचावत ग्राम महसूल अधिकारी श्री एल.एन. गोधने यांनी तसा रितसर पंचनामा पंचासमक्ष करुन दिल्याने खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. आठ लोखंडी बोटी किमती अंदाजे ८०,००,०००/– रुपयेसहा इंजन किमती अंदाने १२,००,०००/– रुपये एक जेसीबी TATA हिताची एद २१,०डउ किमती अंदाजे ५०,००,०००/– रुपये पंचवीस ब्रास गौण खनिज (रेती) किमती अंदाजे १,०५,०००/– रुपये असा एकूण १,४३,०५,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यावरुन आरोपी नामे नवनाथ बालाजी मोरे रा. नायगाव ता. नायगाव जि. नांदेड व इतर अनोळखी आरोपीतांचे विरुष्य पो.स्टे. अमाननगर गुरन २९/२०२५ बलम ३०३ (२), ३ (५) BNS २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अशी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मा.पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत

# संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमीत्य पालखी सोहळा संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मराठवाडा । बाजीराव पाटील गायकवाड**

बंजारा समाजाचे आराध्यदैवत श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त हनुमानगड कमानी समोर गोविंदनगर येथील भव्य पालखी सोहळ्याला दक्षिण नांदेड चे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर उपस्थित राहून सर्व समाज बांधवांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.तसेच संत सेवालाल महाराज ते तुळजाभवानी माता मंदिर पर्यंत आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या विकास निधीतून करण्यात आलेल्या सीसी रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले.त्यावेळी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,आमदार बालाजीराव कल्याणकर,देविदासराव राठोड,बाबा सुभेदारसिंघ लंगर साहिब,शिवसेना सहसंपर्क प्रमुख स.दर्शनसिंघ सिध्दु,प्रकाश राठोड, सुशीलकुमार चव्हाण, संत सेवालाल महाराज मंदिराचे मुख्य पुजारी अमरसिंग राठोड, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.वनमालाताई राठोड,श्याम पाटील वानखेडे,धम्म कदम,संदीप राठोड यांच्यासह परिसरातील नागरिक व बंजारा समाजातील बंधू–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# काळी टेंभी येथील दोन शेतकऱ्यांच्या उभ्या उसाला शॉर्टसर्किटमुळे आग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**



महागाव तालुक्यातील काळी टेंभी येथील दोन अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उभ्या ऊस पिकास दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान शॉट सर्किट मुळे आग लागून आर्थिक नुकसान झाले आहे. या वेळी उमरखेड येथून अग्निशामक दलाच्या वाहनास प्राचारण करण्यात आले होते. महागाव तहसील प्रशासनाने दखल घेत तातडीने उपाययोजना केल्या.

यामध्ये सिनन्ना बंगु पवार यांचे एक हेक्टर विस आर मध्ये ऊस जळून खाक झाले तर शेजारील शेतकरी अविनाश यलप्पा पवार यांच्या पण १ हेक्टर उसाची राख रांगोळी झाली.

यामध्ये शेती उपयोगी वस्तू ज्यामध्ये शेतातील स्प्रिंकलर सट व इतर पाईप जळाली लागलेल्या आगे मध्ये जीवित हानी व पशुहाने झाली नाही. सदर आग शॉर्टसर्किट मुळे लागल्याचे तहसील प्रशासनाच्या चौकशी अहवाला द्वारे मंडळ अधिकारी राम पंडित यांच्याकडून माहिती मिळाली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची गावलगत ऊस शेती असल्याने शॉर्ट सर्किट मुळे लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महागाव तहसीलदार अभय मस्के यांना घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी तातडीने दाखल झाले. उमरखेड येथून अग्निशामक दलाच्या वाहनास प्राचारण करण्यात आले. उभे पिक जळतांना शेतकऱ्याच्या वेदनेला परावर राहिला नाही. तोंडी आलेले ऊस पिक जळाल्याने दोन्ही शेतकरी कमालीचे हैराण झाले आहे. जळालेल्या उसासाठी शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाईची मागणी होत आहे, प्रशासनाच्या वतीने अहवाल तयार करण्यात आला. नॅचरल शुगर साखर कारखान्याकडे अद्यापही अनेक शेतकऱ्यांचा ऊस गेला नाही. मागील झालेल्या विधानसभा निवडणुकीमुळे लांबणीवर पडलेल्या ऊस तोडी कालावधीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पुन्हा अशा घटना होऊन नुकसान होऊ नये यासाठी साखर कारखाना प्रशासनाने तातडीने शेतकऱ्याचा ऊस कारखान्यावर न्यावे अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

# समृद्ध भारतासाठी महामानवाच्या विचारा शिवाय पर्याय नाही–डॉ.शंकर गड्डमवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

मानव फक्त आपले कुटुंब व नातेवाईक यांच्यासाठी धडपडतो परंतु महामानव मात्र जगाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केले,लोकांचे प्रबोधन केले आपल्या घराची राख रांगोळी झाली तरीही ते पर्वा बघितली नाही एवढा मोठा त्याग त्यांनी लोकांसाठी पत्करलेला होता म्हणून समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी महापुरुषांचे विचार आत्मसात केल्याशिवाय पर्याय नाही असे प्रखड मत प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ.शंकर गड्डमवार यांनी बहिशाल व्याख्यानमालेत व्यक्त केले.




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शरदचंद्र महाविद्यालय नायगाव बाजार च्या संयुक्त विद्यमाने बहिशाल व्याख्यानमाला मौजे शेळगाव छत्री येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक व्यंकटराव रामलोड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या वेळी व्याख्याते म्हणून प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ.शंकर गड्डमवार तर समन्वयक प्रो.डॉ.बलभीम वाघमारे, सुभाष वानखेडे, ईश्वर बिजगुरे यासह शेळगाव छत्री येथील युवा नेते संजय पाटील चोंडे, माजी सरपंच जळबा वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी महामानवाचे विचार प्रत्येक माणसात व विद्यार्थी मध्ये कसे रुजले पाहिजे ही पार्श्वभूमी समन्वयक डॉ. बलभीम वाघमारे यांनी प्रस्तावनेतून मांडली तर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व्यंकटराव रामलोड यांच्या वतीने मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. डॉ.गड्डमवार बोलताना पुढे म्हणाले की,सर्व मानवतावादी महापुरुषांना समाज कोणता अभिप्रेत होता ते भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नमूद केलेले आहे, एवढी प्रगल्भता या राष्ट्रपुरुषांच्या विचारात आहे आणि संविधानाने सर्वांना समान अधिकार प्राप्त केले असल्यामुळे त्या अधिकाराच्या बळावर भारत देश समृद्ध बनला पाहिजे यासाठी महापुरुषाचे विचार आत्मसात करावे आणि भारत देश समृद्ध बनवावा असेही ते म्हणाले. यावेळी संभाजी निलावार,आनंदा दाडेराव, नागोराव बैलकवाड, भगवान बोंडलवाड,शंकर पाटील चोंडे व शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती तर सदर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. बलभीम वाघमारे यांनी तर आभार पत्रकार माधव बैलकवाड यांनी मानले.

# टोमॅटोला मिळतोय कवडी मोल भाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । माधव नागलवाड**



सद्या बाजारामध्ये टोमॅटोला कवडी मोल भाव असल्यामुळे उत्पादन खर्च तरी निघेल का नाही म्हणून शेतकरी वर्गातून नाराजीला सुर उमटत आहे तर ग्राहक मात्र टोमॅटो खरेदीसाठी गर्दी करत आहेत.

मागील काही दिवसापासून बाजारात टोमॅटो बरोबर इतरही भाजीपाल्याचे दर उतरले आहेत एकेकाळी १ हजार ते बाराशे रुपयेला जाणारे कॅरेट सद्या १०० रुपयेला जात असल्याले उत्पादन खर्च तरी कसा काढावा असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.सद्य स्थिती मध्ये असणारा दर जर कायम राहिला तर शेतकऱ्यांसाठी मोठी चिंतेची बाब राहणार आहे.त्यामुळे चिंताचूर झालेले शेतकरी टोमॅटोचे उभे पीक काढून टाकत आहेत तर कोणी रस्त्यावर टोमॅटो फेकून देत आहेत. सद्याचे दर कमी असल्याने ग्राहक मोठ्या प्रमाणावर खरेदी साठी येत आहेत विशेषतः टोमॅटो, फुलगोबी, पत्ता गोबी, वांग, मेथी,मिरची, शेंगा आदी ना बाजारात मागणी असल्याने ग्राहकांचा बजेट मध्ये बसत आहे पण भाजीपाल्याला योग्यरित्या भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याला टोमॅटो तोडून बाजारात नेवून पोहचन्याचा खर्च निघत नसल्यामुळे शेतकऱ्यात नाराजी दिसून येत आहे मात्र भाजीपाला बाजारातील ग्राहकांसाठी फायद्याचे ठरत आहे.

# १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त उमरी येथे गणपत माखणे यांचे व्याख्यान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशन गायकवाड**

१९ फेब्रुवारी रोजी उमरी शहरांमध्ये शिवजयंती निमित्त व्याख्याते गणपत माखणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.कुळवाडी भूषण जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उमरीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे.दिनांक १९ फेब्रुवारी रोज बुधवारी सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण व साडेनऊ वाजता शिवव्याख्याते शिवश्री गणपत माखणे यांचे व्याख्यान उमरी मोंढा मैदान येथे आयोजित केले आहे. तरी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirkala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904